श्री पुष्पदंतकृत शिवमहिम्नस्तोत्र

भावार्थ दर्शन

## श्री संत अच्युत महाराज विरचित

(मराठी ओवीबद्ध)

# शिवमाहिम्न स्तोत्र

९८७४

म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

सं. क्र. २३८७



REFBK-0022518

REFBK-0022518

- अनुवादक -

ंत अच्युत महाराज

शिवभवन–श्री क्षेत्र कौंडण्यपूर

मूल्य ) ( नित्योपास

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (विद

श्री पुष्पदंतकृत शिवमहिम्नस्तो

भावार्थ दर्शन

## श्री संत अच्युत महाराज विरचित

(मराठी ओवीबद्ध)

# शिवमाहिम्न स्तोत्र



REFBK-0022518

REFBK-0022518

– लेखन –

जेष्ठ मास दशहरा – समाप्ती, शके १८९४

शिवभवन–श्री क्षेत्र कौंडण्यपूर

मूल्य ) ( नित्योपासना

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ)

धर्मग्रंथ प्रकाशन पुष्प २१

प्रकाशक :– वि. गो. जोशी (तिवसकर)
धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन–श्री क्षेत्र कौंडण्यपूर,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती (विदर्भ)

संग्राहक व प्रथमावृत्ती
मुद्रणकर्ता :
श्रीमान विठ्ठलदास नवले
मु. खोलापूर, ता. जि. अमरावती ( विदर्भ )

सर्व हक्क : सुरक्षित

अनुवादक–
श्री संत अच्युत महाराज
शिवभवन–श्री क्षेत्र कौंडण्यपूर

मुद्रक : व. म. गुप्ते, सुभाष मुद्रणालय,
व्यवस्थापक : वि. गो. जोशी (तिवसकर), तपोवन–अमरावती

द्वितीय संस्करण :
प्रति २०००

मुद्रणतिथी :
चैत्र वद्य पंचमी, शके १८९६
खोलापूर, ता. जि. अमरावती (विदर्भ)

मूल्य : नित्योपासना

卐 श्री गुरु – स्मरण 卐



वंदनीय राष्ट्रसंत सद्‌गुरु

# श्री तुकडोजी महाराज

विदर्भतीर्थ श्री कौंडण्यपुराशी। शके अठराशे चौऱ्याण्णव दशहरा समाप्तीशी। वरदातिरी शिवभवनाशी। स्मरूनी सद्‌गुरूशी काव्य केले॥ श्री तुकडोजी महाराज राष्ट्रसंत। माझे सद्‌गुरु शिव भक्तिनिष्ठ। त्यांचे स्मृतिशी महिम्नस्तोत्र। गुर्वार्पण करीतसो॥ संस्कृताचा भावार्थ कळावा। शिवभक्ता ज्ञानबोध व्हावा। म्हणूनी भावार्थाचा दिवा। उजळला प्राकृती॥

# दोन शब्द



धर्मग्रंथ प्रकाशनाचे हे एक्केवीसावे पुष्प उपासनेच्या मूल्याने मुद्रित व प्रकाशित करतांना आम्हाला अत्यानंद वाटतो.

मराठी भाषेत धर्मग्रंथ विचारांच्या प्रचारात सहयोगी होणारे श्री संत अच्युत महाराज विरचित अनेक धार्मिक पुस्तके आज भाविकांची सर्वत्र सेवा करीत आहेत.

त्यांची स्वकृत ग्रंथपुष्पे त्यांनी श्री बद्रिनारायणाला यात्रा करून समर्पण केल्यावर श्री बद्री-केदार कृपेचा साहित्य प्रसाद म्हणून श्री शिवमहिम्न स्तोत्र मराठी ओवीबद्ध रचले. सोबत शिवोपासना लिहिली ती ह्या पुष्पात छापली आहे.

उपासनाप्रिय ज़नता–जनार्दनाला या साहित्य–पुष्पाचा सदैव लाभ मिळावा अशी प्रभूचरणी विनम्र प्रार्थना करतो.

धर्मग्रंथ प्रकाशन,
शिवभवन–
श्री क्षेत्र कौंडण्यपूर

प्रकाशक,
**वि. गो. जोशी (तिवसकर)**

# " सत्यम् शिवम् सुंदरम् "

श्री क्षेत्र बद्रीनाथ व श्री क्षेत्र केदारनाथ येथील अत्यंत अवघड तथापि आल्हादकारक व स्फूर्तीशाली यात्रा करून आल्यानंतर शिवमहिम्न स्तोत्राचा ओवीबद्ध, भक्तीरसपूर्ण, भावार्थ भाविक जनतेला ज्ञानबोध व्हावा म्हणून श्री संत अच्युत महाराज यांनी रचला आहे.

आपल्या भारतामध्ये अनेक ठिकाणी शिवाची प्राचीन मंदिरे असून शिवोपासनेला आजही फार महत्व आहे. शिवाची म्हणजे शंकराची उपासना ही सत्यम्, शिवम्, सुंदरम्‌चीच उपासना आहे. आपले जीवन उन्नत करून ते मंगलमय व पवित्र करण्याकरिता अहोरात्र प्रयत्न करणे हीच साधना आहे.

शिवव्रत घेणे हे आधीच कठीण व ते अखंड चालविणे म्हणजे महान तपस्या आहे. यामध्ये अध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्याची शक्ती आहे. सुखासीन जडवादी झालेल्या आजच्या जनतेला अज्ञान–अंधःकारातून ज्ञानप्रकाशाकडे नेण्याकरिता श्री संत अच्युत महाराजांनी हा शिवमहिम्नाचा भावार्थ दीप प्राकृत भाषेत उजळला आहे.

मराठी भाषेमध्ये ओवीबद्ध महाभारत, भागवत, गीता, दुर्गासप्तशती, गुरुगीता, श्रीविष्णुसहस्रनाम, अनेक संत चरित्रे, भजनमाला, तीर्थमहिमा, उपासना इ. धर्मसाहित्य मानवाच्या जीर्णोद्धाराकरिता छापून सेवेस तयार केलेले आहे. त्यांच्या संकल्पाप्रमाणे त्यांची स्वकृत ( महाभारत आणि भागवत इत्यादी ) वीस धार्मिक पुस्तकांची रचना, ही सर्व साहित्य पुष्पे श्री बद्रीनाथांच्या चरणी श्री संत अच्युत महाराजांनी

अर्पण केली ही गोष्ट आपल्या महाराष्ट्राला फार भूषणास्पद आहे. आतापर्यंत आपली धर्मसाहित्य सेवा श्री बद्रीनारायणाच्या चरणी अर्पण करण्याची प्रथा नव्हती, असे मला वाटते. सुवर्णाक्षरांनी लिहिली जावी अशी पुष्पांजली अर्पण करण्याची नवीन प्रथा वंदनीय श्री संत अच्युत महाराजांनी सुरू केली याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

संस्कृत महिम्न स्तोत्राचा भावार्थ मराठी भाषेत ओवीबद्ध केल्यामुळे शिवोपासकांना अध्यात्मिक साधनेकरिता फार मदत होईल. आपल्या महाराष्ट्रीय जनतेने या सुसंधीचा फायदा घेऊन शिवोपासना व ज्ञानोपासना अखंड चालू ठेवावी अशी शिवचरणी प्रार्थना आहे.

संस्कृत शिवमहिम्न स्तोत्र माझ्या बालवयापासून पाठ असल्यामुळे मला त्याबद्दल अत्यंत आदर आहे. मराठी ओवीबद्ध शिवमहिम्न स्तोत्र श्री अच्युत महाराजांनी रचलेले पाहिल्यावर मला फार आनंद वाटला. त्याबद्दल लिहिण्याची पात्रता नसताना मला चार शब्द सुचले ते मी लिहिले आहेत. भाविक जनतेने ते गोड करून घ्यावेत.

॥ करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा ॥
॥ श्रवण नयनजं वा मानसं वाऽपराधम् ॥
॥ विहितमविहितं वा सर्वमेतद् क्षमस्व ॥
॥ जय जय करुणाब्धे श्री महादेव शम्भो ॥

शांतीकुंज--तपोवन **सौ. पार्वतीबाई पटवर्धन**
व्यासपूजा, शके १८९४



द्वितीयावृत्ती मुद्रणकर्ता

**श्रीमान विठ्ठलदास नवले**

खोलापूर (विदर्भ)



श्री. विठ्ठलदास नवले

यांच्या आजी

**श्रीमती पार्वतीबाई रामासा शहा**

श्रीमहाभारत, श्रीमद्भागवत, सप्तशती, गीता, गीत-भागवत, भजनमाला, सत्यनारायण व्रतकथा, श्रीरामजन्मकथा, गुरुगीता, श्रीविष्णु सहस्रनाम स्तोत्र, श्री शिवमहिम्न स्तोत्र, श्रीरामरक्षा स्तोत्र व अनेक संत चरित्रांचे लेखक आणि अनुवादक



श्री संत अच्युत महाराज, शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ)

# धन्योद्गार

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील धर्मग्रंथ प्रकाशनाला समर्पित होणारी धार्मिक नित्योपयोगी पुस्तके भाविकांना अमृततुल्य होत. श्री संत अच्युत महाराज यांच्या ईश्वरीचिंतनपूर्ण लेखणीतून विविध धर्मविचारसाहित्य उपलब्ध होत आहे.

श्रीमहाभारत व श्रीमद्भागवतासारखे विशाल धर्मग्रंथ ज्यांनी मराठी ओवीबद्ध भावार्थरूपाने लिहून समाजाला अभ्यासार्थ दिले त्या वंदनीय महाराजांनी रामजन्मकथा, दत्तजन्मकथा, वटसावित्रीकथा, अनेक संत कथा, विविध उपासना, भजनमाला, तीर्थमहिमा इत्यादी नित्योपयोगी लहान पुस्तके लिहिली आहेत.

सद्भाविक लोक या धर्मकाव्याचे महत्व जाणून सदुपयोगार्थ हे लिखाण छापून विनामूल्य वाटत आहेत. ते धर्मविचारांचे प्रसारणकार्य सहयोग देवून अनेकांनी पुढे चालविले पाहिजे. तशी परमेश्वर वेळोवेळी भाविकांना बुद्धि देत असतो.

विष्णुसहस्रनाम, दत्तजन्मकथा, शुभस्तवन इत्यादी पुस्तिका विनामूल्य भाविकांना अर्पण झाल्या. त्या सद्भाविकांच्या साहित्यदानाचे व्रतात महिम्नस्तोत्र मराठी पुनर्मुद्रण करून श्री. विठ्ठलदास नवले हे एक आवश्यक सेवेची भर घालीत आहेत. या पुस्तिकेचे वाटप त्यांच्या पूजनीय आजी

श्रीमती पार्वतीबाई शहा यांचे स्मरणार्थ ते विनामूल्य करणार आहेत.

अशाप्रकारे पितृॠणातून धर्मसेवा साधून उॠण होणारे श्री. विठ्ठलदास यांना मी शतशः धन्यवाद देतो. उत्तम संस्कारासाठी नित्योपयोगी धर्म-पुस्तकांचे अनुवाद व लिखाण करणाऱ्या श्री संत अच्युत महाराजांच्या सत्कार्याचे धन्यतापूर्वक त्यांच्या प्रकाशनकार्यासहित शुभचिंतन करतो.

**भा. आ. पोतदार**

खोलापूर ( विदर्भ ) बी. ए. एल्एल्. बी. बी. टी.

# श्रीशिव – मंगल ध्यान

( वृत्त : शिखरिणी )

सदाशीवाचे मी हृदयी धरतो ध्यान बरवे ।
तयाचेनी जागे हृदयभुवनी ज्ञान बरवे ॥
जया मृत्यू आहे सकल जग हे तोच रचतो ।
जगाचे रूपाने नटूनि पुढति तोच उरतो ॥ १ ॥

महद्‌भूतांचे जो वदन मिरवे पंचमुख हा ।
जगत्कल्याणाची शिरि धरतसे अक्षद पहा ॥
स्विकारी बिल्वाशी त्रयगुण बरे पत्र म्हणुनी ।
महामाया पत्नी गणपतिस् दे जन्म सगुणी ॥ २ ॥

महाकाळाला ही शिवस्मरण लागेच करणे ।
मुनी मार्कंडेये शिवपदि दिले अंतीं धरणे ॥
महा वीषाचेही पचन सहजे जो शिव करी ।
शिवाला मी ध्यातो सतत धरुनी नाम अधरी ॥ ३ ॥

॥ ॐ हरये नमः ॥



॥ ॐ नमः शिवाय ॥



# शिवमहिम्न स्तोत्र

( छंदः ओवी )

हे शंकरा ! ब्रम्हादिक नेणती तेथे माझी वाचा किती ? । स्तोत्र रचती यथामति । गोड करावे ॥१॥ वाणी मनाशी कळेना । वेदालाही आकळेना । म्हणुनी सगुणगायना । धावती भक्त ॥ २ । तू वेदामृत निर्मिता । ब्रम्हा न करू शके तव स्तोत्रा । वाचा पावन व्हावयाकरिता । मी काही गातसो ॥३॥ जगदोत्पत्ति जीवन नाश । तो तू ब्रम्हा विष्णु महेश । भाग्यहीन ते भाविकास । संशयी पाडती ॥४ । तुझे मूळ पाहो जाती । तर्क वितर्की चरफडती । आपापली मते मांडती । पाडती भ्रम लोका ॥५॥ सामर्थ्यपूर्ण जग व्याले । समर्थावीण कैसे झाले ? । ऐसे असुनी वाढले । मूर्खपणे संशय ॥६॥ नद्या सागरी मिळती । विभन्न मते हुंबरती । ते तुजमाजी सामावती । आस्तिक नास्तिक ॥७॥ वृषभ खट्वांग परशु चर्म । सर्प नरकपाल ल्याला भस्म । विषयेच्छा मृगजळी विश्राम ।

तरी तू ज्ञाता निर्लिप्त ।।८।। कोणी म्हणती जग शाश्वत ।
कोणी म्हणती अशाश्वत । मी नेणो यातील निश्चित ।
तरी धारिष्ट स्तोत्राचे ।।९।। सत्यलोकी ब्रम्हा चढला ।
विष्णु पाताळाशी गेला । त्यांच्या भक्तिस तू भेटला ।
सेवा तुझी सर्वदात्री ।।१०।। तुज शिरकमळ वाहिले । म्हणोनी
रावणा बळ लाभले । तेणे त्रिभुवन जिंकले । तरी मद जिरेना
।।११।। तो उपटू पाहे कैलास तू आंगठ्याने दाबशी त्यास ।
पाताळी त्या मोहित दुष्टास । आधार मिळेना ।।१२।। इंद्राहुनी
ऐश्वर्यवान । त्रिलोकी बाणासुर सम्पन्न । तुझ्या चरणी तो
अनन्य । महिमान म्हणोनी ।।१३। सर्व ब्रम्हांड क्षयकारी ।
विष धरले कंठाभीतरी । तो नीलकंठ ही भूमिवरी भूषण
जाहला ।।१४।। सर्व विजेता मदन । जिंकू पाहे तुजलागून ।
जितेंद्रिया ! त्वा तो जाळून । सामर्थ्य दाविले ।।१५ ।। पृथ्वी
खचते नभ पडते । तुझ्या नर्तनी ऐसे वाटते । जटा झाडता
त्रास स्वर्गाते । तू घोर महाकाळ ।।१६।। आकाशगंगा अंत-
राळी । ती त्वा जटेत सामावली । बिंदुरूपे जी विस्तारली ।
घेरली पृथ्वीला । १७।। पृथ्वी-रथ ब्रम्हासारथि । विष्णु-बाण
चंद्रसूर्य चक्रेनी । स्वछंदे मग त्रिपुराप्रती । त्वा तृणवत् जाळले
।।१८। अर्पिता सहस्र कमळे । तुज नेत्रकमळ वाहिले । त्वा
त्याशी सुदर्शन दिले । तो विष्णु रक्षी त्रिलोक ।।१९।। यज्ञ-
संस्था तू चालविशी । श्रद्धेला फुंकर देशी । म्हणुनी यज्ञकर्माशी ।
उपासती जन । २०।। दक्ष प्रजापति यजमान । भृगु देवता सभा-
जन । ऐशा यज्ञात तुझा अपमान । तो यज्ञ मोडला ।।२१।
ब्रम्हा लोभला स्वकन्येशी । मृगरुपे धावे पाठीशी मृगशीर्षरूप

त्या विधिशी । ताडिशी तू आर्द्रारूपे ।। २२ ।। मदनाला तुवा जाळले । तरी पार्वतीने तप मांडले । ती मानी पतिशी वश केले । परी ते अज्ञान ।। २३ ।। स्मशान-वासी भूते सोबती । भस्म अंगी गळचात कवटी । परी मंगल तू भक्ताप्रती । वरदायका ! ।। २४ ।। वासना-निरोधे जिकले चित्त । आनंदोर्मी रोमांचयुक्त । परमात्म-ज्ञाने सेवी अमृत । ते योगसौख्य तू ।। २५ ।। चंद्र सूर्य वायु अग्नि जळात । ज्ञाते पाहती नभ पृथ्वी आत्म्यात । परी आम्हास दिसे तुझे तत्व । सर्वत्र विस्तारले ।। २६ ।। वेद अवस्था भुवने तीन । ॐ परमाक्षरी देवता तीन । विविध ध्वनीने निर्माण । ॐ दर्शन तुझे शिवा ! ।। २७ ।। भव शर्व रुद्र पशुपति । उग्र महादेव भीम ईशान स्तुति । वेदही तिला मान देती । वंदितो ते प्रियधाम ।। २८ ।। वनप्रिया ! दूर निकट । सान थोर धाकटा श्रेष्ठ । हे ते तू सर्वरूपस्थित । तुला नमस्कार ।। २९ ।। रजोगुणे विश्वोत्पत्ति । तमोगुणे संहार स्थिती । सत्वगुणे सुखव्याप्ती । गुणातीता वंदन ।।३०।। तू अमर्याद शाश्वत । माझे तुज लाजे चित्त । अधिकार विसरुन स्तोत्र । तुला वाहतसो ।३१।। सुवर्णपर्वताची शाई सागरी । कल्पवृक्ष-लेखणी कागद-धरत्री । सरस्वती लिहील अहो-रात्री । तरी तुझे स्तोत्र सरेना ।३२।। गंधर्वपति पुष्पदंत । तेणे स्तविला उमाकांत । जो निर्गुण ऋषि देव दैत्य । यांनी पूजिलासे ।। ३३ ।। भक्तिपुर्वक नित्य पठण । देई भक्ति कीर्ती आयुष्य धन । त्याचे शिवलोकी समर्पण । रुद्रलोकी होतसे ।।३४।। महादेव श्रेष्ठ देवता । महिम्न स्तोत्रा सर्व श्रेष्ठता ।

गुरुविण कोण दे तत्वार्था ? । अघोर मंत्र निरुपम ॥३५॥ दीक्षा दान तप तीर्थ ज्ञान । यज्ञादिकाशी तुळता महिम्न । सोळावा अंश ही त्यांचे पुण्य । महिम्नाहून असेना । ३६॥ गंधर्वराज पुष्पदंत । शिवक्रोधे झाला पदभ्रष्ट । तेणे रचले हे दिव्य स्तोत्र । शिवमाहात्म्याचे ।।३७।। इहपर लाभाचे साधन । पुष्पदंतकृत शिवस्तवन । प्रशंसिती देव मुनिजन । पठण त्याचे तारक ॥३८॥ गंधर्वरचित अतुल सुंदर । ऐसे हे ईश्वरवर्णनपर । कल्याणप्रद शिवस्तोत्र । समाप्त झालेसे ॥३९॥ वाङ्मयरुपी पूजन । करता शिवचरणार्पण । देवेश्वर सदाशिव पावन । व्हावयाचा ॥४०॥ महेश्वर स्वरूप न कळे । तुज कधी न मी पाहिले । असशील तैसा चंद्रमौळे ? । तुला नमस्कार ॥४१॥ एक दोन तीन पाठ । स्तोत्रावरील श्रद्धा उत्कट । तो सर्व पापापासुनी मुक्त । शिवलोक पावतसे ॥४२॥ श्री पुष्पदंतमुखकमलापासून । पापहारी शिवप्रियस्तवन । त्याचे एकाग्र श्रवण पठण । करी प्रसन्न महेश । ४३॥

इति श्री पुष्पदंत विरचित । शिवमहिम्न स्तोत्र । अच्युत रची ओवीबद्ध प्राकृत । शिवभक्तांच्या सेवेशी ॥४४॥ विदर्भतीर्थ श्री कौंडण्यपुराशी । शके अठराशे चवऱ्याण्णव दशहरा–समाप्तिशी । वरदातिरी शिवभवनाशी । स्मरुनी सद्गुरुशी काव्य केले ॥४५॥ श्री तुकडोजी महाराज राष्ट्रसंत । माझे सद्गुरू शिव भक्तिनिष्ठ । त्यांचे स्मृतिशी महिम्नस्तोत्र । गुर्वर्पिण करीतसो ॥४६॥ संकृताचा भावार्थ कळावा । शिवभक्ता ज्ञानबोध व्हावा । म्हणुनी भावार्थाचा दिवा । उजळाला प्राकृती ॥४७॥ प्राकृत धर्मग्रंथ रचले । श्री बद्रीनारायण क्षेत्री वाहिले ।

मग केदारकृपेने हे स्फुरले । शिवमहिम्न स्तोत्र ॥४८॥ येथे जे न्यून दिसे । तो दोष माझे माथी असे । श्रद्धेचा प्रकाश वसे । ते देणं शंकराचे ॥ ४९ ॥ महिम्नस्तोत्ररूपी शंकरा । वाहतो अर्धशत ओवी पुष्पहारा । अच्युत करी नमस्कारा । तुज तुझ्या कृपेने ॥५०॥

**॥ ॐ हरये नमः ॐ हरये नमः ॐ हरये नमः ॥**

## आरती श्री शंकराची

ॐ हर हर हर महादेव ।
जय शिव ओंकारा, जय शिव ओंकारा ॥
चंद्रकोर शोभे शिरी गंगाजलधारा ॥ ॐ । धृ ॥

शांति–हिमाचली आसन कैलासावरती ।
त्रिशूल डमरू हाती ज्ञानाग्नी प्रखरा ॥ ॐ ॥ १ ॥

गणेश कार्तिक बाळे जनमंगलकारी ।
तुझी सुंदरी गिरिजा पराभवी असुरा ॥ ॐ ॥ २ ॥

योगानंद अखंडित वैभव त्यागाचे ।
पाप ताप भक्तांचे दैन्य दुरीत हरा ॥ ॐ ॥ ३ ॥

त्रिपूरहंता अमृतमंथनी हालाहल प्याला ।
त्रेतायुगी अवतरला अंजनीकुमरा ॥ ॐ ॥ ४ ॥

नंदिकेश्वरवहना काळ तुझ्या चरणी ।
अच्युत आरती उजळुनी नमितो दातारा ॥ ॐ ॥५॥

**नमन** ( छंद : अनुष्टुप )

नमस्कार नमस्कार । शंकरा ! कर उद्धार ।।
तव नामे हा संसार । सुगम होवो तराया ।।

**भजन**

( चाल– तुझे ध्यान हे अंति )

शिवनामात मन हे असो रंगले ।
नसो संसारमायाजळी गुंतले ।।धृ.।।
भरला जगामध्ये हा स्वार्थ पहा ।
देता घेता काही मग कोठे रहा ।
गरिबाला जेथे तेथे दूर लोटले ।। १ ।।
नाना पंथ मते आपुले सांगती ।
एकमेकाशी रागाने पहा भांडती ।
भोळे भाविक भ्याले आणि त्रासले ।। २ ।।
म्हणुनी हा त्यागी शिव स्मशानी वसे ।
उपकाराविणा त्याला धंदा नसे ।
त्याच्या भक्तांनी जीवन सेवेत वाहिले ।। ३ ।।
शिवमंदिरी कैलास दर्शन करू ।
जनसेवेची कावड खांदी धरू ।
अच्युत म्हणे यात भाग्य थोरले ।। ४ ।।

**प्रार्थना श्लोक** ( वृत्त–भुजंगप्रयात )

सदाशिव सर्वत्र आत्मा जगाचा ।
विधी विष्णु तो जीव या देवतांचा ।।
जगी मोक्ष तो साक्षी सर्वा जनाशी ।
तया सेविती तेच ते धाम काशी ।। १ ।।

शिवाचे जिथे रम्य मंदीर आहे।
शिवोपासना भक्तिने चालताहे॥
तिथे तो उमाकांत स्वानंद सेवी।
जिथे नित्य राहे दया धर्म जीवी॥ २॥
घडो राष्ट्रसेवा घडो धर्मसेवा।
घडो लोकसेवा घडो आत्मसेवा।
घडीने घडी ही घडो सार्थकाते।
नमो शंकरा! हे! नमस्ते नमस्ते॥ ३॥

## अंतिम शुभकामना

( छंदः अनुष्टुप )

स्वातंत्र्य सौख्य आरोग्य, लाभो सर्वत्र या जना।
पूर्णकाम असो सारे, दुःख थोडे नसो कुणा॥ १॥
योग्य काळात वर्षा हो, पिकावे धान्य पृथ्विचे।
क्षोभ देशातुनी जावो, कोणालाही नसो भय॥ २॥
तेज वीर्य बल ओज, सत्चारित्र सहिष्णुता।
थोर गुण तुझे देवा, आम्हा सर्वास येऊ दे॥ ३॥
असत्यातुनी सत्याचे, अंधारातुनी ज्योतिचे।
मरणात अमृताचे, घडु दे प्रभु दर्शन॥ ४॥
वृद्धश्रवा विश्ववेदा, अरिष्टनेमि बृहस्पति।
होवो मंगल सर्वांचे, देवांना हीच प्रार्थना॥ ५॥
कानांनी शुभ ऐकु दे, डोळ्यांनी शुभ पाहु दे।
हे जीवन तुझे देणे, महिमा तुझी गावु दे॥ ६॥

# एकशेअकरा—श्री शिवनामावली

ओम् श्री शिवाय नमः
,, ,, शंभवे नमः
,, ,, शशिशेखराय नमः
,, ,, विरूपाक्षाय नमः
,, ,, नीललोहिताय नमः
,, ,, शूलपाणये नमः
,, ,, विष्णूवल्लभाय नमः
,, ,, अंबिकानाथाय नमः
,, ,, भक्तवत्सलाय नमः
,, ,, शर्वाय नमः
,, ,, शितीकंठाय नमः
,, ,, उग्राय नमः
,, ,, अंधकार सुरसूदनाय नमः
,, ,, कालकालाय नमः
,, ,, भीमाय नमः
,, ,, मृग पाणये नमः
,, ,, कैलासवासिने नमः
,, ,, कठोराय नमः
,, ,, वृषाकाय नमः
,, ,, भस्मोद्धूलित विग्रहाय नमः
,, ,, अष्ट मूर्तये नमः

ओम् श्री महेश्वराय नमः
,, ,, पिनाकिने नमः
,, ,, वामदेवाय नमः
,, ,, कपर्दिने नमः
,, ,, शंकराय नमः
,, ,, खट्वांगिने नमः
,, ,, शिपिविष्ठाय नमः
,, ,, श्रीकंठाय नमः
,, ,, भवाय नमः
,, ,, त्रिलोकेशाय नमः
,, ,, शिवप्रियाय नमः
,, ,, कामारये नमः
,, ,, गंगाधराय नमः
,, ,, ललाटाक्षाय नमः
,, ,, कृपानिधये नमः
,, ,, परशुहस्ताय नमः
,, ,, जटाधराय नमः
,, ,, कवचिने नमः
,, ,, त्रिपुरांतकाय नमः
,, ,, वृषभारुढाय नमः
,, ,, सामप्रियाय नमः
,, ,, स्वरमयाय नमः
,, ,, अनीश्वराय नमः

ओम् श्री सर्वज्ञाय नमः
,, ,, सोमसूर्याग्नि
लोचनाय नमः
,, ,, सोमाय नमः
,, ,, सदाशिवाय नमः
,, ,, वीरभद्राय नमः
,, ,, प्रजापतये नमः
,, ,, दुर्धर्षाय नमः
,, ,, अनघाय नमः
,, ,, भर्गाय नमः
,, ,, गिरि प्रियाय नमः
,, ,, नटेश्वराय नमः
,, ,, भगवते नमः
,, ,, मृत्युंजयाय नमः
,, ,, जगद्व्यापिने नमः
,, ,, व्योमकेशाय नमः
,, ,, चारुविक्रमाय
नमः
,, ,, स्थानवे नमः
,, ,, दिगंबराय नमः
,, ,, अनेकात्मन नमः
,, ,, शुद्ध विग्रहाय
नमः
,, ,, अजाय नमः
,, ,, मृडाय नमः

ओम् श्री परमात्मने नमः
,, ,, हविषे नमः
,, ,, यज्ञमयाय नमः
,, ,, पंचवक्राय नमः
,, ,, विश्वेश्वराय नमः
,, ,, गणनाथाय नमः
,, ,, हिरण्यरेतसे नमः
,, ,, गिरीशाय नमः
,, ,, भुजंग भूषणाय नमः
,, ,, गिरि धन्वने नमः
,, ,, कृति वाससे नमः
,, ,, पुरारातये नमः
,, ,, प्रमथाधिपाय नमः
,, ,, सूक्ष्म तनवे नमः
,, ,, जगद्गुरवे नमः
,, ,, महासेनकाय नमः
,, ,, रुद्राय नमः
,, ,, भूतपतये नमः
,, ,, अहिर्बुध्न्याय नमः
,, ,, अष्टमूर्तये नमः
,, ,, सात्विकाय नमः
,, ,, शाश्वताय नमः
,, ,, खंड परशवे नमः
,, ,, पाशवि मोचनाय नमः
,, ,, पशुपतये नमः

ओम् श्री देवाय नमः
,, ,, अव्ययाय नमः
,, ,, पूष दंत भिदे नमः
,, ,, दक्षाध्वरहाय नमः
,, ,, भगनेत्र भिदे नमः
,, ,, सहस्राक्षाय नमः
,, ,, अपवर्गप्रदाय नमः
,, ,, तारकाय नमः
,, ,, काशी विश्वेश्वराय नमः
,, ,, सेतुबंध रामेश्वराय नमः

ओम् श्री महादेवाय नमः
,, ,, हरये नमः
,, ,, अव्यग्राय नमः
,, ,, हराय नमः
,, ,, अव्यक्ताय नमः
,, ,, सहस्रपदे नमः
,, ,, अनंताय नमः
,, ,, पार्वती परमेश्वराय नमः
,, ,, गोकर्ण महाबळेश्वराय नमः

ॐ नमः शिवाय

**पार्वतीपते हर हर महादेव !**

ॐ तत्सत् ! !

REFBK-0022518
REFBK-0022518

ओम् श्री सर्वज्ञाय नमः
,, ,, सोमसूर्याग्नि लोचनाय नमः
,, ,, सोमाय नमः
,, ,, सदाशिवाय नमः
,, ,, वीरभद्राय नमः
,, ,, प्रजापतये नमः
,, ,, दुर्धर्षाय नमः
,, ,, अनघाय नमः
,, ,, भर्गाय नमः
,, ,, गिरि प्रियाय नमः
,, ,, नटेश्वराय नमः
,, ,, भगवते नमः
,, ,, मृत्युंजयाय नमः
,, ,, जगद्व्यापिने नमः
,, ,, व्योमकेशाय नमः
,, ,, चारुविक्रमाय नमः
,, ,, स्थानवे नमः
,, ,, दिगंबराय नमः
,, ,, अनेकात्मन नमः
,, ,, शुद्ध विग्रहाय नमः
,, ,, अजाय नमः
,, ,, मृडाय नमः

ओम् श्री परमात्मने नमः
,, ,, हविषे नमः
,, ,, यज्ञमयाय नमः
,, ,, पंचवक्राय नमः
,, ,, विश्वेश्वराय नमः
,, ,, गणनाथाय नमः
,, ,, हिरण्यरेतसे नमः
,, ,, गिरीशाय नमः
,, ,, भुजंग भूषणाय नमः
,, ,, गिरि धन्वने नमः
,, ,, कृति वाससे नमः
,, ,, पुरारातये नमः
,, ,, प्रमथाधिपाय नमः
,, ,, सूक्ष्म तनवे नमः
,, ,, जगद्गुरवे नमः
,, ,, महासेनकाय नमः
,, ,, रुद्राय नमः
,, ,, भूतपतये नमः
,, ,, अहिर्बुध्न्याय नमः
,, ,, अष्टमूर्तये नमः
,, ,, सात्विकाय नमः
,, ,, शाश्वताय नमः
,, ,, खंड परशवे नमः
,, ,, पाशवि मोचनाय नमः
,, ,, पशुपतये नमः

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील धर्मग्रंथ प्रकाशनाची
श्री संत अच्युत महाराज विरचित

## * धार्मिक - पुस्तके *

गीता, भागवत, सप्तशती, महाभारत,
श्री गुरुगीता, अनेक संत कथा, सत्यनारायण
व्रतकथा, श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र,
श्रीराम जन्मकथा, श्री दत्तजन्मकथा,
भजनमाला व तीर्थमहिमा
इत्यादी पुस्तके खरेदी करून
धर्मग्रंथ प्रकाशनाचा लाभ घ्यावा.

- प्रकाशक

- पुस्तके मिळण्याची प्रमुख ठिकाणे-

१) धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती ( विदर्भ )

२) व्यव. सुभाष मुद्रणालय, तपोवन-अमरावती (विदर्भ)